पंचांग

■ शनिवार, दिनांक २५ एप्रिल २०२६

■ वैशाख शु. ९, श्री शालिवाहन शके १९४८, विक्रम संवत् २०८२, पराभवनाम संवत्सर, सौर ग्रीष्म ऋतु, उत्तरायण. ■ सीता नवमी, जानकी जन्म, ■ नक्षत्र : आश्लेषा, योग : गंड, करण : बालव/तैतिल
■ सूर्योदय : ६.१७ वा., सूर्यास्त : ६.५४ वा.
■ राहु काल : सकाळी ०९.०० ते १०.३०

राशिभविष्य

मेष : नवीन व्यवसाय सुरू करण्यास मित्रांचे सहाय्य मिळेल.

वृषभ : मातेसंबंधात तेढ निर्माण होईल, असे भाष्य टाळा.

मिथुन : मानभंग मिटवण्यासठी प्रयत्न करावेत.

कर्क : नवीन व्यवसायाची संधा तरी सुरुवात नको. भागीदारी नको.

सिंह : घाईगडबडीत शारीरिक दुखापती. वाहन जपून चालवा.

कन्या : ऐनवेळी सहकारी शब्द फिरवतील. मन:स्तापाचा दिवस.

तुळा : वाहन व वास्तुसंबंधात अडलेली कामे मार्गी लागतील.

वृश्चिक : अभिमानास ठेच पोहोचवणारी घटना घडेल. गुलाबाचे तळ ठेवा.

धनु : मानसिक, शारीरिक आरोग्य उत्तम राहील. प्रवासाचा योग येईल.

मकर : गुप्तिते उघड करणाऱ्या गोष्टी टाळा. पचनाचाचाची वेळ येईल.

कुंभ : संपत्ती लाभ शांतपणे व विचारपूर्वक घ्यावा.

मीन : मित्रमंडळीकडे भाग्योदयाची वाट खुली. आनंदी दिवस.

व्यक्तिविशेष | मार्कोनी गुग्लेमो

बिनतारी संदेशवहन यंत्राच्या शोधाबद्दल ज्यांना नोबेल पारितोषिक लाभले अशा मार्कोनी मार्चोंड्या गुग्लेमो या इटालियन भौतिकशास्त्रज्ञाचा जन्म २५ एप्रिल १८७४ रोजी बोलोग्ना येथे झाला. मार्कोनी यांनी १८९४ पासूनच बिनातारी संदेशयंत्राचे संशोधन सुरू केले होते. परंतु इटलीत त्यांना या कामात फारसे प्रोत्साहन मिळाले नव्हते. म्हणून १८९६ मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी अनेक शोध लावले. अनेक नव्या शोधांची पेटंटस् मिळविली. १९१८ मध्ये त्यांनी इंग्लंडमधून ऑस्ट्रेलियाला पहिला रेडिओ संदेश पाठविला. बिनातारी संदेशवहनाच्या आपल्या कार्यात यश लाभल्याने पुढे मायदेशी परत येऊन त्यांनी नौदलात सेवा केली. पॅरिसमध्ये झालेल्या १९१९ च्या शांतता परिषदेत इटलीचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम पाहिले. १९३५ मध्ये त्यांनी रशियाची निर्मिती केली. साऱ्या जगाच्या संदेशवहन क्षेत्रात क्रांती घडविणाऱ्या बिनतारी संदेशवहन यंत्रामुळेच अजरामर ठरलेल्या मार्कोनीचे २० जुलै १९३७ रोजी रोम येथे निधन झाले.

दिनविशेष

- १८७४ बिनतारी संदेशयंत्राचे जनक मार्कोनी गुग्लेमो यांचा जन्म.
- १८८९ सुदेश कालखाणा बांधकामास प्रारंभ.
- १८९६ रायगडावरील शिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार.
- १९४५ संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेसाठी विविध देशांची सॅन फ्रान्सिस्को येथे बैठक.
- १९५३ डीएनएचे वर्णन करणारा लेख प्रकाशित.
- १९८२ भारतात रंगीत दूरदर्शन सुरू.
- १९९२ अफगाणिस्तानात तालिबान राजवट प्रस्थापित.

जिज्ञासा | सोन्याचा रंग

जगभरात लोकप्रिय वाटू अशी ओळख असलेल्या सोन्याचा सोनेरी रंग बदलण्यात संशोधकांना यश आले आहे. विशेष म्हणजे कोणताही रंगाचा लेप न देता अथवा रासायनिक प्रक्रिया न करता हा रंग बदलला गेला असून, त्याचा फायदा अनेक क्षेत्रांना होऊ शकणार आहे, असाही संशोधकांचा दावा आहे. तसेच त्यामुळे दागिन्यांची प्रचंड कराराची ग्राहकांना उपलब्ध होऊ शकेल. सोन्याचा एकच नेकलेस एका डाळूने लाल तर दुसऱ्या बाजूने हिरवा अथवा कोणत्याही रंगाचा हिरू शकेल. तीन चार कांदीच्या दागिन्यांबाबतही होईल. कोणत्याही वस्तूला मानवी डोळ्यांना दिसणारा रंग हा त्या वस्तूवर पडणारे प्रकाशकिरण किती शोषते जातात आणि किती परावर्तित होतात, यावर अवलंबून असतो. उदा. एखादी वस्तू लाल दिसत असेल तर याचा अर्थ बाकीचा रंगाचे प्रकाशकिरण ती वस्तू शोषून घेत असते तर लाल रंग मात्र परावर्तीत करत असते. सोन्यावर या प्रयोग करताना संशोधकांनी नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करून सोन्याचेच काही ठराविक उंची, रुंदीचे उंचवटे सोन्याच्या वस्तूच्या पृष्ठभागावर एम्बॉस केले.

॥ ॐ रामकृष्णहरि ॥

सार्थ ज्ञानेश्वरी अध्याय क्र. १२ भक्तियोग, ओवी ०१३ ते ०१८

संवादफळनिधानें । प्रमेयाचीं उद्यानें । लावीं म्हणे गहनें । निरंतर ॥ १३ ॥
(संवाद म्हणजे विरोधी वाक्यांची एकवाक्यता) या संवादरूपी फळाला आश्रयस्थान होणाऱ्या सिद्धांतांच्या गोठणीच्या बागा सर्वकाळ लाव म्हणजे पूर्वीच्या निरुपणात परस्पर विरोध राहील व सिद्धांतला बाधा येईल असे निरुपण होऊ देऊ नकोस.

पाखांडाचे दरकुटें । मोठीं वाग्वाद अकाटें । कुतर्काचीं दुष्टें । सावजें फेडीं ॥ १४ ॥
पाखांड - म्हणजे श्रुतिस्मृतीपुराणे यांना सोडून असणारे विचार, त्याच कोणी दऱ्या आणि खिंडयाच्या आडवाटा यांचा विध्वंस कर. कुतर्क म्हणजे प्रमाणावर उभारलेले विकास मंत्री प्रमाणावर उभारले नसलेले तर्क- हेच कोणी हिंसक प्राणी, यांचा नायनाट कर म्हणजे नास्तिक विचारांचा, विरुद्धवादाचा व कुतर्काचा सहज नाश होईल असे माझे निरुपण होऊ दे.

श्रीकृष्णगुणीं मातें । सर्वत्र करीं वो सरतें । राणिवे वैसवीं श्रोतयातें । श्रवणाचियें ॥ १५ ॥
सर्वत्र श्रीकृष्णाचे गुणवर्णन करण्यात मला उत्साह वाटेल, असे कर आणि श्रोतेगणांना एकाग्र श्रवणाच्या राज्यावर बसव- म्हणजे श्रोत्यांकडून आत्मने एकाग्रतेने श्रवण होऊ दे.

ये मऱ्हाठियेचिया नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळ करीं । घेणें देणें सुखचिवरी । हों देईं वा जगा ॥ १६ ॥
या मराठी भाषेच्या नगरात ब्रह्मविद्येचा सुकाळ कर आणि या ब्रह्मविद्येचा व्यवहार घेण्यादेण्याचा व्यवहार ब्रह्मसुखाचाच होऊ दे

तूं आपुलेनि स्नेहपल्लवें । मातें पांडुरंगविसीन सदैवें । तरी आतांचि हें आधवें । निर्गमे माये ॥ १७ ॥
हे सद्गुरू जननी ! महद्भाग्यवान पुरुषांनाच प्राप्त होणाऱ्या आपल्या कृपादृष्टीरूप प्रेमपदराने मला झाकशील, तर वर वर्णन केलेल्या गुणांनी युक्त असे संपूर्ण निरुपण आलाच निर्माण करीन.

इये विनवणीयेसाठीं । अवलोकिलें गुरु कृपादृष्टी । म्हणे गीतार्थेसी उठी । न बोलें बहु ॥ १८ ॥
ज्ञानेश्वर महाराजांनी, अशी सद्गुरू श्रीनिवृत्तीनाथांची प्रार्थना केल्यावरोबर, श्रीनिवृत्तीनाथांनी त्यांच्याकडे कृपादृष्टीने पाहिले व "गीतार्थ सांगण्यास सुरुवात कर, फार बोलू नको" असे ते म्हणाले. (क्रमश:)

-जगदीश गो. पाटील
डोंकी, ता. जि. धाराशिव
मोबा. : ९४२१४ ६५०८२

आ. गायकवाडांचे विधान विकृत

कठोर कारवाई करा ■ हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी

मुंबई : प्रतिनिधी

शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केलीच पण त्यांची भाषा आपण घाणेरडी, विकृत व गुन्हेगारी प्रवृत्तीची असल्याचा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

गांधी भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, आमदार संजय गायकवाड हे सातत्याने दादागिरी व गुंडगिरी करत असतात. आमदार केंटिनमध्ये कामगारांना मारहाण करणे, खुलाडाच्या बाहू तस्करी, जबरदस्तीने जमीन बळकावणे, कोणालाही अत्यंत खालच्या भाषेत शिविगाळ करणे, ही त्यांची गुन्हेगारी कृत्ये सुरूच आहेत. एवढेच काय तर भाजप हा हिजडयांचा पक्ष आहे, देवेंद्र फडणवीस यांच्या तोंडात कोराचाचे जंतू साठा, राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्यास १० लाखांचे बक्षीस देऊ असे प्रताप या आमदार महोदयांनी बापूंची केले आहेत. फडणवीस यांच्यात हिम्मत असेल तर त्यांनी त्यांच्या पक्षाला दिलेल्या शिव्यांची तरी दखल घेऊन आमदार संजय गायकवाड यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी, पण मुख्यमंत्री मात्र या आमदाराला पाठीशी घालत आहेत, असे सपकाळ म्हणाले. भाजपा व त्यांचे हस्तक शिवाजी महाराज यांचा अवमान करत असतात, राहुल गोलापूरकर, प्रशांत कोरटकर यांसारख्या विकृतांनी महाराजांचा अपमान केला त्यावेळीही फडणवीस यांनी काहीच कारवाई केली नाही. छत्रपतींचा अवमान करणाऱ्यांचे फडणवीस एकप्रकारे समर्थनच करत आहेत, असे वाटून दिसते असेही सपकाळ म्हणाले. दरम्यान एका पुस्तकाचाच अशाप्रकारे शिवीगाळ करणे आणि पुस्तकाची सत्यता काय आहे, हे जाणून न घेता प्रतिक्रिया देणे संयम नसल्याचे द्योतक आहे. पण त्यांच्या अशा वाणण्याने पक्ष नेतृत्वावर आक्षेप येईल, हे गायकवाड यांच्या लक्षात आले नाही.

आ. गायकवाडांची दिलगिरी

▶विरोधकांच्या आक्रमक भूमिकेनंतर आणि महायुतीमधील राजकीय नेत्यांनी देखील त्यांच्या फोनवरून सावध भूमिका घेतल्यानंतर अखेर आ. संजय गायकवाड यांनी शिवीगाळीच्या घडलेल्या प्रकरणाबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख मोहमी सन्मानपूर्वकच व्हावा, ही आपली ठाम भूमिका असल्याचेही संजय गायकवाड यांनी स्पष्ट केले आहे.

सरकारशी संबंधितांवर गुन्हा नाही



▶सहित पवार म्हणाले, प्रशांत आंबी यांनी काल पुरावासह रीतसर तक्र- र केल्याही अपाही एफआयआर दाखल झालेला नाही. आमदार असाल, सत्ताधारी असाल, सरकारशी संबंधित असाल म्हणजे एफआयआर दाखल करायचा नाही हा गृहखात्याचा नवा नियम आहे का?

गुंडगिरी खपवून घेणार नाही

▶आमदार गायकवाड यांनी प्रकाशक आंबी यांना शिव्या दिल्या. लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारीच्या पदावर असलेल्या व्यक्तीने अशा प्रकारे गुंडगिरीची भाषा वापरणे हे लोकशाहीला घातक आहे. अशा आमदारांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला पाहिजे अशी मागणी काँग्रेसचे नेते रवींद्रीधर यांनी केली आहे.

आमदारकी रद्द करा

▶साहू महाराज छत्रपती म्हणाले की, सार्वजनिक जीवनात असलेल्या व्यक्तीनी बोलताना जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. कोणाबद्दल काय बोलायचे याचे भान नसणे ही गंभीर बाब आहे. गायकवाड यांनी केलेले वक्तव्य अजिबात योग्य नसून, त्यावर सरकारने तातडीने कारवाई करावी, असे त्यांनी नमूद केले. आमदारकी रद्द करण्याबाबतचे नियम मला ठाऊक नसले तरी, त्यांच्या वर्तनावर कठोर पावले उचलतीच पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले.

शिंदेसेनेचा संबंध नाही

संजय गायकवाडयी जी ऑडिओ क्लीप फिरतेय, त्याची सत्यता माहिती नाही. पण संजय गायकवाडांच्या वक्तव्याशी आणि विचारांशी पक्षाचा संबंध नाही. हे त्याने वैयक्तिक मत, पक्ष त्याचे समर्थन करत नाही, असे प्रकार महाजन यांनी स्पष्टपणे सांगितले.

जाब विचारणाऱ्या महिलेविरोधात तक्रार

झेन सदावर्तेने केली तक्रार

मुंबई : संसदेत नारी वंदन विधेयक नामंजूर झाल्याच्या निषेधाचे भाषणे करताना कादलेल्या जनआक्रोश मोर्चात आपला संताप व्यक्त करणाऱ्या त्या महिलेची ठोकेदुसी आता वाहण्याची शक्यता आहे. सार्वजनिक ठिकाणी घातलेला गोंधळ, मंत्र्यांशी केलेली हुज्जत आणि पोलिसांच्या कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी या महिलेविरोधात वरळी पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. गुणरत्न सदावर्ते यांची कन्या झेन सदावर्ते हिने ही तक्रार दिली असून, संबंधित महिलेवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. मुंबईतील चांचांची मैदान परिसरात भाषणे मंत्री महाजन यांच्या नेतृत्वाखाली एका भव्य मोर्चाचे आयोजन केले होते.

अपशब्दांचा वापर आणि पाण्याची बाटली फेकली

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हीडीओनुसार, ही महिला अत्यंत आक्रमक झाली होती. तिने पोलिसांना शांत करू आणि निमूट जा असे म्हणत त्यांचे काम अडवण्याचा प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर, तिने पाण्याची बाटली फेकून मारली. मंत्री मिताली महाजन यांनी या महिलेचा संताप शांत करण्याचा प्रयत्न केला आणि अत्यंत संयमी भूमिका घेतली.

राज्यात तब्बल २० हजार 'एक्स्टसी' गोळ्यांची विक्री

मुंबई : प्रतिनिधी

टिटवाळ्या पार्टी ड्रग्ज प्रकरणाच्या तपासातून उघड झालेल्या धक्कादायक माहितीत या प्रकरणातील मुख्य आरोपी आमिर राज्यभर याने परदेशातून तब्बल २५ हजार एक्स्टसी या पार्टी ड्रग्ज गोळ्यांचा साठा मागवून त्यापैकी सुमारे २० हजार गोळ्या अवघ्या सात ते आठ महिन्यांत विकल्याचे समोर आले आहे. याप्रकरणात त्याची प्रेयसी अश्विनी पाँल हिचीही महत्त्वाची भूमिका असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. मुंबई महानगरासह राज्यातील किरकोळ विक्रेत्यांना या गोळ्यांची विक्री करण्यात आली आहे. त्यांच्याकडून पुढे अनेक कॉलेजियन्सपर्यंत हा साठा पोहोचल्याची शक्यता आहे.

माहितीनुसार, आमिर आणि अश्विनी यांनी गेल्या वर्षी जून-जुलैदरम्यान आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करांच्या संपर्कातून हा साठा भारतात आणला. फेब्रुवारीपर्यंत या गोळ्यांची विक्री मुंबई महानगर प्रदेशासह इतर राज्यातील किरकोळ विक्रेत्यांना करण्यात आली.

महाराष्ट्रात 'मराठी' अनिवार्यच

अमित ठाकरेंचा मध्य रेल्वे प्रशासनाला इशारा

मुंबई : मध्य रेल्वेच्या भरती प्रक्रियेत प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकेसाठी हिंदी-इंग्रजीसोबत मराठी भाषेचा समावेश करत प्रशासनाने सुधारित अधिसूचना जाहीर केली आहे. मनसेच्या इशाऱ्यानंतर मराठी अस्मितेला न्याय मिळाला असला तरी महाराष्ट्रात मराठी अपरिहार्य आहे. महाराष्ट्रात मराठी भाषेला योग्य सन्मान मिळालाच हवा. पुन्हा अशी चूक करून मराठी तरुणांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केल्यास तो खपवून घेतला जाणार नाही.

परवाना नूतनीकरणावेळी मराठीचे ज्ञान बंधनकारक

मराठीच्या अनिवार्यतेसाठी सरकारचे निर्णायक पाऊल

वाहनचालकांसाठी नियमांत मोठे बदल

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

मुंबई : प्रतिनिधी

आंटो रिक्षा व टॅक्सी (मोटार कॅब) चालकांचा परवाना नूतनीकरणाच्या वेळी मराठीचे ज्ञान दाखवणे बंधनकारक असेल. यामुळे राज्यातील रिक्षा व टॅक्सी चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधणे अधिक सुलभ होणार असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी येथे दिली.

राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत प्रवाशांशी सुसंवाद साधणाऱ्या मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करत महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णयाच्या दिशेने पाऊल टाकले आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ४, ७८ आणि ८५ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून, त्याअंतर्गत वाहनचालकांसाठी मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान ('बॅकिंग लॅंग्वेज') अनिवार्य करण्याची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. राज्याच्या परिवहन आयुक्तांनी यासंदर्भातील प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला असून, त्यानुसार मसुदा अधिसूचना काढण्याची प्रक्रिया सुरू आहे.

हरकती व सूचना मागविण्याची प्रक्रिया सुरू

या मसुदा नियमांवर नागरिक, संघटना तसेच संबंधित घटकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत प्राप्त होणाऱ्या सर्व सूचनांचा शासनाकडून विचार करण्यात येणार आहे.

दिनेश हिंगूची भावूक कहाणी

मुंबई : बॉलिवूडमध्ये काम करून, प्रसिद्धी मिळवून एक अशा अभिनेता आहे जो वयाच्या ८६ व्या वर्षीही अभिनय क्षेत्रात सक्रिय आहे. वयानुसार डॉक्टरांकडे जाण्यासाठी पैशांची गरज असल्याने हा अभिनेता आजही काम करतोय. त्यांचं नाव आहे दिनेश हिंगू. 'हेराफेरी' आणि 'फिर हेरा फेरी' या सिनेमांमधून चर्चेत आलेले दिनेश आर्थिक समस्यांपुढे आजही अभिनय क्षेत्रात सक्रिय आहेत. मुंबईपासून एका मुलाखतीत दिनेश यांनी हा खुलासा केला आहे.

(पान १ वरून)

आपचे ७ खासदार...

आहे. त्यामुळे जड अंतःकरणाने पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे, असे म्हटले. मी चुकीच्या पद्धतीने गोष्ट मांडूस असल्याची जाणीव मेल्या काही वर्षांमध्ये झाली. आता मी आम आदमी पक्षापासून दूर जात आहे आणि जनतेच्या जवळ जात आहे, असे चड्ढा म्हणाले. आपल्यासोबत आपला सोडचिठ्ठी देणाऱ्या खासदारांची नावेदेखील राघव चड्ढा यांनी सांगितली. पक्षाचा राजीनामा, विलिनीकरणाबाबतची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली असून, राज्यसभेतील पक्षाचे दोन तृतीयांशपेक्षा जास्त खासदार भाजपमध्ये विलीन होत असल्याचे ते म्हणाले. राज्यसभेत आपचे एकूण १० खासदार असून त्यातील ७ जण चड्ढा यांच्यासह भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.

विलिनीकरणाच्या कागदपत्रांवर सात खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यांच्या स्वाक्षऱ्या असलेले पत्र राज्यसभेच्या सभापतींना पाठवण्यात आले आहे. यावेळी चड्ढा यांच्यासह पक्ष सोडणारे अशोक कुमार मित्तल, संदीप पाठक पत्रकार परिषदेला उपस्थित होते. पक्षाला प्रचंड धुसमूट होत आहे. आणी देशहितासाठी विचार करणारा पक्ष आता केवळ वैयक्तिक हितासाठी, फायद्याचा विचार करत आहे. त्यामुळे पक्षापासून दूर जात असल्याचा निर्णय घेतल्याचा दावा चड्ढांनी केला.

सात खासदारांची पंजाबसोबत गद्दारी

आज आम आदमी पार्टीने ७ खासदार भाजपमध्ये सामील झाले. ही सात नावे पंजाबच्या जनतेने लक्षात ठेवावीत, पंजाबसोबत गद्दारी करणाऱ्यांना पंजाबची जनता माफ करणार नाही. राघव चड्ढा पार्टीने आम्हाला केले, खासदार केले, पंजाबच्या जनतेने राज्यसभेत पाठवले. आणि तुम्ही भाजपच्या कुशीत पोहोचलात. संदीप पाठकलाही पंजाबच्या जनतेने राज्यसभेत पाठवले. हरभजन सिंगला संसदेत पाठविले, परंतु ७ जणांनी पंजाबसोबत गद्दारी केली, असे संजय सिंह म्हणाले.

धाराशिवला होणार....

येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कौडगाव एमआयडीसीत दोन प्रकल्पांची उभारणी होणार आहे. पहिल्या १००० एकरांवर संरक्षण दलासाठी आवश्यक टीएनटी आणि प्रपोलंट तयार केले जातील. नैसर्गिक खाणी उपलब्ध होईल. गात तयार होणारा सीबीजी आणि खत कंपनीने जिल्ह्यातच साथे, असे ठरले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत कंपनीचे प्रमुख गणेश निंबे यांच्याशी ८ एप्रिल २०२५ रोजी पहिली भेट झाली होती. त्यांनी एक हजार एकर गावेच्या अपेक्षा व्यक्त केली होती. कौडगाव, होटी, माळुंब्रा, अपसिंगा आणि लिंगाणच्या जागा त्यांना दाखवण्यात आल्या होत्या. त्यांनी कौडगाव एमआयडीसीतील जागेवर शिक्कामोर्तब केले, असे आमदार पाटील यांनी सांगितले.

भवियष्यात ५००० एकरवर डिफेन्स हब

कौडगाव एमआयडीसीला लागूनच भवियष्यात जवळपास ५००० एकरांवर संरक्षण क्षेत्राशी निगडित एक महाकाय हब उभारण्याचे नियोजन आहे. प्लांब फार्म (नेवे इंडस्ट्रीज) यांनी तसा शब्द दिला आहे. कौडगावजवळ उपलब्ध ३० हजार एकर पडीक जमिनीवर १००४ मध्ये औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचे उरवले होते. सुरुवातीला १५०० एकर संपादित केले. आता डिफेन्स हब साठी पडीक जमीन उपलब्ध करून देण्यात येईल. भवियष्यात देशाला संरक्षण साहित्य पुरवणारा जिल्हा म्हणून धाराशिव जिल्ह्याला नावलौकिक होईल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

तेर येथे तेरणा नदीत...

गावात वाऱ्यासरखी पसरताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत नदीपात्रात शोधकार्य सुरू केले. दरम्यान, तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांच्या सूचनेनुसार धाराशिव येथील एसडीआरएफ पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी बोटीच्या साह्याने नदीपात्रात शोधमोहीम हाती घेतली. तथापि, दिवसभर प्रयत्न करूनही तरुणाचा ठावठिकाणा लागला नाही. सायंकाळी अंधार पडू लागल्याने ६ च्या सुमारास शोधकार्य थांबविण्यात आले. रविवारी सकाळी पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान, तलाठी प्रशांत देशमुख, सहाय्यक पोलिस निरीक्षक विलास हजारे हे घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. या घटनेमुळे परिसरात खळबळ व्यक्त होत आहे.

वाणदारी इन्स्टिमिशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय - क्रीयू, ५ एलाइनमेंट पार्टनर, इन्फिनिटी टावर्स, आउटर रिंग रोड, पोलमपल्ली, सिंद्री १६००३४
CIN- U42201DL2025GOI450109
तातडीचे सूचना
वाणदारी इन्स्टिमिशन लिमिटेड
परिवर्तन पत्रावरा मंडुरी अर्जाचा (इश्यूज क्र. ६३/२०२६) सूचना/हरकती आमंत्रित
१. वाणदारी इन्स्टिमिशन लिमिटेड यांच्या मंडुरीसाठी अर्ज उपलब्ध करून आणि पात्रतेनुसार होत निवडक कर्मचारी वर्गाकडून ३०४३ च्या कलम १८ (३) च्या ५५ अंतर्गत तरतुदीनुसार सादरीकरण करावे लागेल. सदरील अर्जाचाचे २३ मार्च २०२६ रोजी अर्ज उपलब्ध करून घेतला आहे आणि वाणदारी इन्स्टिमिशन लिमिटेडच्या निधीचा विनियोग, २०२६ च्या कलम १५(३) अंतर्गत संबंधित सूचना एकाधिक कलमांचे निर्देश दिले आहेत.
२. कर्जदाराचे इकॉर्ड (RE) विभागाचे वाणदारीत अडकले गुंतवणूकदारी आणि बंद करून घेतलेल्यांकडून, वाणदारी इन्स्टिमिशन लिमिटेडच्या व्यवसाय अंगा-व्यवहार संबंधित प्रकाशने मसुदा कागदपत्रांचा एक दिवस आधा हाताने दोहोत होता आहेत मसुदा कागदपत्रे आणी आणि. वाणदारीने ४०४/१०० रोजी एकत्रकरण कागदपत्रे दोन. सोबतच्या संबंध अर्जाचे संबंधित संबंधित तपशील आणि इतरांचे आणि इतरांचे एकत्रकरण संबंधित संबंधित. इतरांच अर्जे आणि इतरांचा इतरांच इतरांच वाणदारीच्या व वाणदारी इन्स्टिमिशन लिमिटेड संबंधित मसुदाच्या अधिसूचित केलेल्या परिवर्तनी कंपनीदारे निर्देशित आवश्यक व्यवहारांच निर्देश दिलेत.
३. एकत्रकरण कागदपत्र अधीचा मसुदा अर्ज

अ. क्र.	परिवर्तन योजनेची माहिती	प्रस्तावी कार्यान्वयनाचा निर्धारित COD	एकत्रकरणा प्रस्तावाच्या निर्धारित COD या मसुदा कागदपत्रांच्या पहाता परिवर्तन मुख्यकर्ता टप्प्याची	संबंधित घटकांचा व्यावसायिक कार्यान्वयनाची (सीओडी) परिवर्तन कागदपत्रांची पूर्व, आवश्यक असलेले घटक
१.	१X५०० MVA, ४००/२२० kV ICT आणि ४०० kV पारेषणाचा १X१५० MVA बस रिजेक्टर AIS कागदपत्रांचा व्यवहार. • ४०० / २२० केव्ही, ५०० एमव्हीए, आयसीटी - ०१ नग. • १५० MVAr, ४०० kV बस अणुभट्टी - १ क्र. • ४०० केव्ही लाईन वे - ०६ नग. • ४०० केव्ही आयसीटी बे - ०३ नग • ४०० केव्ही बस रिजेक्टर बे- ०१ नग. • २२० केव्ही लाईन वे - ०४ नग. • २२० केव्ही आयसीटी बे - ०३ नग. विभाजनाचा अध्यक्षता तपशील - • १X५०० एमव्हीए ४००/२२० केव्ही आयसीटीचा व्यवहार • ४००/२२० केव्ही, ५०० एमव्हीए, आयसीटी - ०१ नग. • ४०० केव्ही आयसीटी बे - ०१ नग • २२०केव्ही आयसीटी बे - ०१ नग.	राज्यांची इन्फ्रास्ट्रक्चरमधून २६ महिने	१००%	योजनेच्या एवं सहकारे प्रकाश केली कार्यान्वयन करणे आवश्यक आहे, कारण त्याचा काम इकोसिस्टम कार्यान्वयनाला अवलंबून आहे.
२.	४०० केव्ही एलएमव्ह कारडी (एकीत) १ यू.५ केव्ही एलएमव्ह पुरा पुरवी एक ४०० केव्ही ट्रीएमी लाईन (अनुक्रमित) • ४०० केव्ही, ६३ एमव्हीआर रिॲक्टर लाईन रिजेक्टर ४०० kV AIS कागदपत्रांचा व्यवहार MOs वर. • ४०० केव्ही, ५० एमव्हीआर रिॲक्टर लाईन रिजेक्टर ४०० केव्ही एलएमव्ह पुरा पुरवी बेय (अनुक्रमित) - ०१ नग • ४०० केव्ही एलएमव्ह पुरा पुरवी बेय ४०० केव्ही एलएमव्ह लाईन वे पुरवी पुरवी (अनुक्रमित) - ०२ नग			
३.	४०० केव्ही एलएमव्ह कारडी (एकीत) यू.५ ४०० केव्ही एलएमव्ह पुरवी बेय (एकत्र-०२) एवं ४०० केव्ही ट्रीएमी लाईन • ४०० केव्ही एलएमव्ह पेरीएम ४०० केव्ही लाईन वे पुरवी बेय (एकत्र-०२) - ०२ नग			
४.	४०० kV AIS कागदपत्रे (एकीत) यू.५ ४०० kV AIS कागदपत्रे (अनुक्रमित) एवं ४०० kV DC लाईन • ४०० केव्ही एलएमव्ह लाईन बेय ६१० केव्ही बी एलएमव्ह कारडी (अनुक्रमित) - ०२ नग			
५.	४०० केव्ही एलएमव्ह कारडी एवं बेय जोडणारी ४०० केव्ही लाईन वे पुरवी. • ४०० केव्ही लाईन वे - ०४ नग			
६.	कारडी एवंदेय ४०० केव्ही एलएमव्ह एवं वेय जोडणारी ३१० केव्ही लाईन वे पुरवी. • ३१० केव्ही लाईन वे - ०४ नग			
७.	४०० केव्ही एलएमव्ह कारडी (एकीत) यू.५ ४०० केव्ही एलएमव्ह कारडी (अनुक्रमित) एवं २२० केव्ही ट्रीएमी लाईन. • ३२० केव्ही एलएमव्ह लाईन बेय ३२० केव्ही या एलएमव्ह कारडी (अनुक्रमित) - ०२ नग			

४. टीएम आयोग एवंमध्ये अंगा (ट्रांसमिशन) परिवर्तनाचा कागदपत्रे अंतिमतेने अधिकार केले आहुत. वाणदारे इन्फ्रा पुरा आणि-टाय योजना कागदपत्रे व्यवस्था. एकत्रकरण आणि विभाजनाचाचे योजना पत्रावर विद्यार्थी आवश्यक आहे. त्यानुसार, कागदपत्रे योजना इन्फ्रास्ट्रक्चर कि. ने योजना कागदपत्र विद्यार्थ्यांसाठी कायमच अंमलबजावणी आणि कागदपत्रे योजना आणी आणी.
५. कंपनीच्या कागदपत्रे नियमित कागदपत्रे व्यवहार आणि कागदपत्रे एकत्रकरणाचाचे कागदपत्रे व्यवहार कागदपत्रे व सूचना. संबंधित व्यवहार आणी आणि कागदपत्रे अंतर्गत या एकत्रकरणे विषय प्रोटोकॉलचे विद्यार्थ्यांसाठी मेल. कार्यालय आणी प्रस्तावित आणीत.
अ. नाव : श्री. विवेक कुमार
ब. अर्जाचे प्रत्यक्ष पाठवायचे किंवा प्रोटोकॉलची पत्रिकाचाचा पत्ता : कंपनीचे निबंधकांचे कार्यालय निर्दिष्ट. ८ मजला, टॉवर-ए, वाणदारे अर्जाचा विभाग पत्ता, सेक्टर १०, द्वारका, दक्षिणेकडे ११०००७
क. कंपनीची किंवा प्रोटोकॉलची वेळ: कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी ७:०० वा. दरम्यान
ड. परिवर्तन अर्जाचे कागदपत्रे (इलेक्ट्रॉनिक) ₹१०००/- रुपे किंवा DD/ चेकद्वारे कागदपत्रे CD पत्रक कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक "कार्यालय" तेथे पत्रक पाठवे लिखी येथे पत्र आणि.
इ. एक डिस्क्रीटेशन अंतर्गत एक डिस्क्रीटेशन बाजारपेठ काम येईल. तर डिस्क्रीटेशन : https://ibbidaddam.com/
१. प्रस्तावित कंपनीच्या कार्यालयाच्या मुख्य, वरिष्ठ प्रमुख आणि कागदपत्